पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

# पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस शिपाई भरती २०२२-२३

## -: उमेदवारांकरीता सुचना :-

*******

पुणे ग्रामीण पोलीस घटकाची पोलीस शिपाई भरती २०२२-२३ च्या मैदानी चाचणीत उत्तीर्ण होवून लेखी परिक्षेस पात्र झालेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक २०.८.२०२४ रोजी घोषित करण्यात आला आहे. लेखी परिक्षेस पात्र असलेल्या एकूण ५५५३ उमेदवारांची दिनांक ३१.८.२०२४ रोजी लेखी परिक्षा घेण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

पोलीस शिपाई पदाच्या लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांची परिक्षा " **MIT ADT University, Vishwrajbaug. Tal- Haveli. District - Pune. Pin ४१२२०२**" या ठिकाणी दिनांक ३१.८.२०२४ रोजी सकाळी १०:०० वा घेण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी लेखी परिक्षेच्या ठिकाणी दिनांक ३१.०८.२०२४ रोजी सकाळी ०६:०० वा. उपस्थित रहावे.

(पंकज देशमुख) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण
तथा अध्यक्ष,
पोलीस भरती निवड मंडळ.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

# पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस शिपाई भरती २०२२-२३

## -: उमेदवारांकरीता सुचना :-

*******

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या घटकातील पोलीस शिपाई पदाच्या ४४८ रिक्त पदांकरिता ५५५३ उमेदवार लेखी परिक्षसे पात्र झाले असून त्या उमेदवारांची दिनांक ३१.८.२०२४ रोजी सकाळी १०:०० वा " MIT ADT University, Vishwrajbaug. Tal- Haveli. District - Pune. Pin ४१२२०२" येथे परिक्षा घेणार आहे. सदर लेखी परिक्षेच्या अनुषंगाने पोलीस शिपाई पदाकरिता लेखी परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी दिनांक ३१.८.२०२४ रोजी सकाळी ठिक ०६:०० वा. उपस्थित रहावे.

### उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, स्वतःचे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेले फोटोची दोन प्रत सोबत आणावी.
2. लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.
3. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापूर्वी चार तास अगोदर पोहचणे अपेक्षित आहे.
4. उत्तरपत्रिका कार्बनलेस ओ.एम. आर. प्रकारची दोन प्रतित असेल व दुय्यम प्रत उमेदवारास त्याच्या सोबत घेऊन जाण्यास परवानगी देण्यात आली आहे.
5. OMR Sheet वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच फक्त काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन सोबत आणावे.
6. OMR Sheet वर स्वतःची ओळख उघड होईल असे कोणतेही चिन्ह नमुद करू नये / नाव लिहू नये खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये, असे आढळून आल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.
7. उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
8. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.
9. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन / डिजीटल डायरी / मायक्रोफोन / कॅलक्युलेटर / नोट पॅड / नोटस् पुस्तके / ईअरफोन / hearing aide device इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहीत्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहीत्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळून

Scanned with OKEN Scanner

आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

10. अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परिक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका / तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी घटक प्रमुख (भरती अध्यक्ष) यांच्या नावाने रु. २००/- शुल्कासह हजर राहून लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणाऱ्या उमेदवाराच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

(पंकज देशमुख) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण
तथा अध्यक्ष,
पोलीस भरती निवड मंडळ.

Scanned with OKEN Scanner
CamScanner